महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२५/प्र.क्र.१७/२०२५/जाहिरात दिनांक : २९ मार्च , २०२५

## - : शुद्धिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ जाहिरात क्रमांक ४१४/२०२३ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग व इतर मागास वर्गवारीचा विकल्प सादर केलेल्या उमेदवारांबाबत**

**संदर्भ :- आयोगामार्फत दिनांक ०८ मे, २०२४, ३० मे, २०२४, १२ जुलै, २०२४, २४ जुलै, २०२४ रोजी प्रसिद्ध केलेली शुद्धिपत्रके**

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ मधील राज्य सेवा पूर्व परीक्षा- २०२४ चा निकाल दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी जाहिर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेतून पात्र ठरलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक(आ.दु.घ.) अथवा अराखीव (खुला) मधून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (एसईबीसी ) अथवा इतर मागास वर्गवारीचा(इ.मा.व.) विकल्प निवडलेल्या काही उमेदवारांना मुख्य परीक्षेचा अर्ज करताना त्यांच्या अर्जामध्ये सुधारित विकल्प दिसून न आल्याने अर्ज करताना आलेल्या अडचणींबाबत त्यांची निवेदने प्राप्त झाली आहेत . यासंदर्भात खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-

**१.** महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२४ ची जाहिरात (जा.क्र. ४१४/२०२३) दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. दरम्यान राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने तसेच शासनाच्या दिनांक २८ मे, २०२४ व दिनांक १२ जुलै, २०२४ रोजीच्या शासन पत्रातील अभिप्राय विचारात घेऊन संदर्भिय शुद्धिपत्रकाद्वारे अराखीव (खुला) अथवा आ.दु.घ. वर्गवारीतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली होती.

**२.** शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक १२ जुलै, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार ज्या उमेदवारांना एसईबीसी तसेच इ.मा.व. वर्गवारीचे जात प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे, अशा उमेदवारांना आ.दु.घ. प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय नाही. त्यामुळे एसईबीसी अथवा इ.मा.व.प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही मागास प्रवर्गास आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचा विकल्प अनुज्ञेय नाही, ही बाब आयोगाच्या दि.१२ जुलै २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार उमेदवारांच्या स्पष्ट निदर्शनास आणून देण्यात आली होती.

**३.** तसेच एसईबीसी अथवा इ.मा.व. प्रवर्गातील विकल्प दिलेल्या उमेदवारांकडून दिनांक २४ जुलै, २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार NCL – "Yes" किंवा "No" असा दावा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा विकल्प दिलेल्या बऱ्याच उमेदवारांनी NCL संदर्भात "Yes" किंवा "No" असा कोणताही दावा केलेला नाही, अशा उमेदवारांचा मूळ अर्जातील दावा कायम राहिल्याने त्यांना राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या अर्जामध्ये त्यांनी नोंदविलेला सुधारित विकल्प निदर्शनास आला नाही.

**४.** यास्तव, प्रस्तुत प्रकरणी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ करीता उमेदवारांना अर्ज सादर करताना आलेल्या तांत्रिक अडचणी विचारात घेता महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता ज्या अराखीव अथवा आ.दु.घ. वर्गवारीतील उमेदवारांनी एसईबीसी अथवा इ.मा.व. असा विकल्पाचा दावा केला आहे, परंतु NCL बाबत कोणताही दावा केला नाही, अशा उमेदवारांना त्यांनी यापूर्वी उपरोक्त संदर्भिय शुद्धिपत्रकास अनुसरून दिलेल्या विकल्पाच्या दाव्यानुसार त्यांचा एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा पूर्व व मुख्य परीक्षेसाठी दावा त्यांचे NCL प्रमाणपत्र मुलाखतीच्या टप्प्यावर

तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्य सेवा पूर्व परीक्षा – २०२४ चा निकाल सुधारित करण्यात आला आहे. सुधारित निकालाच्या अनुषंगाने अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी मिळावी यास्तव प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याचा कालावधीस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा सुधारित कालावधी | **दिनांक २० मार्च, २०२५ रोजी १४.०० ते दिनांक ०६ एप्रिल, २०२५ रोजी २३:५९** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा सुधारित अंतिम दिनांक | **दिनांक ०६ एप्रिल, २०२५ रोजी २३:५९** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा सुधारित दिनांक | **दिनांक ०८ एप्रिल , २०२५ रोजी २३:५९** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा सुधारित अंतिम दिनांक | **दिनांक ०९ एप्रिल, २०२५** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**५.** राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ करीता अर्ज सादर करताना ज्या उमेदवारांनी एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा विकल्प दिला आहे, अशा उमेदवारांनी त्यांच्या विकल्प दिलेल्या प्रवर्गातून अर्ज करणे व NCL बाबत "Yes" किंवा "No" असा स्पष्ट दावा करणे अनिवार्य आहे. तसेच सदर उमेदवारांनी मुलाखतीवेळी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**६.** एसईबीसी वर्गवारीच्या आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व दिनांक ०५ जुलै, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र मुलाखतीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

**७.** राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ९.४.२ येथील तरतुदीनुसार मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी नुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे तपासली जाईल.

**८.** महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ करीता मूळ जाहिरात तसेच जाहिरातीस अनुसरून आजतागायत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व शुद्धिपत्रके व राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या अधिसूचनेतील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग